|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/14/युसंका-44/ 53 /2019 दि.09/02/2019

प्रति,
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा यांचे मा. संचालक/विभाग प्रमुख यांना -**

**विषय:- विद्यापीठस्तरीय युवा संसद कार्यशाळा सहभागाबाबत.....**
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/44/246/2018, दि.30/07/2018

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, त्यास सभोवतालचे वातावरण अवगत व्हावे असा प्रयत्न विभागाद्धारे केला जात आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी **विद्यापीठस्तरीय युवा संसद कार्यशाळेचे** आयोजन **दि.22 ते 24 फेब्रुवारी, 2019** या कालावधीत **जिजामाता शैक्षणिक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार** येथे आयोजित करण्यात येत आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, युवा संसद कार्यशाळेत विद्यार्थ्यांना संसदीय कामकाज, सादरीकरण पध्दत, प्रश्न मांडणी, उत्तर देण्याची पध्दत, गट नेत्याचे कार्य, पीठासन अधिकारी कर्तव्य यासंदर्भातील तज्ज्ञांना बोलावून मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालय/ मान्यता प्राप्त परिसंस्था/ शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार **संघ** निवड करुन पाठवावा, ही विनंती.

* संघामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी निवडतांना लोकप्रशासन व राज्यशास्त्र विशेष स्तरावर अभ्यासक्रमाची पदवी / पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांना प्राधान्यक्रम देण्याचा प्रयत्न करावा.
* सदर विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, बोलका निर्णय घेणारा, कला जोपासणारा व नेतृत्व गुण सांभाळणारा असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन 2018-19) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य/संचालक/ग्रंथालय प्रमुख यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.
* सदर विद्यार्थी-विद्यार्थिनीने यापूर्वी विद्यापीठ/ राज्य /राष्ट्रीय स्तरावरील युवा संसद कार्यशाळेत सहभाग घेतलेला नसावा.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत नि:शुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**
* युवा संसद कार्यशाळा उद्घाटन सोहळा दि. 22 फेब्रुवारी, 2019 रोजी सकाळी 9.30 वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळी 9.00 वाजेपर्यंत कार्यशाळे स्थळी उपस्थित राहाणे अगत्याचे आहे.
* कार्यशाळा कालावधी 03 दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.

* कार्यशाळेला प्रत्येक महाविद्यालयातील **एका संघाची** निवड करुन त्यांना पाठवावे, याची कृपया नोंद घ्यावी.

* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.
* युवा संसद कार्यशाळा असल्याने सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांनी पात्रानुरुप वेशभूषा व आवश्यक साहित्य सोबत आणावे.
* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण, अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**
1. मा.प्राचार्य कार्यालय-दूरध्वनी क्र.(02564)232832, ई-मेल jesascc@yahoo.com
2. प्रा.विजय पंडित सुर्यवंशी, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र.8999699219

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळवितो की, सदर कार्यशाळेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.20/02/2019** पर्यंत **मा.प्राचार्य, जिजामाता शैक्षणिक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार** यांना jesascc@yahoo.com या इमेलवर व सर्व दस्तऐवज विद्यार्थ्यांसोबत पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास Home page वर Circular Link आणि Students Development मध्ये उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. सत्यजित साळवे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत** :- विद्यार्थी स्वयंवृत्त
* **प्रत माहितीसाठी :-**
  1) **मा. प्राचार्य, जिजामाता एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नंदुरबार**
  2) डॉ. संजू भटा पाटील, नंदुरबार जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, वि. वि. म. चे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि.नंदुरबार
  3) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
  4) प्र.उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
  5) उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
  6) विभाग प्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद पत्रकारिता विभाग, कबचौउमवि, जळगाव
  7) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
  8) कक्षाधिकारी, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
  9) पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

Z:\\VBOXSVR\xp_data\RMB\Yuva Sansad karyashala 2018-19.docx

☎: (९१) ०२५७-२२५७४१८, ४१९ वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७-२२५७४०३, ४०६ ई-मेल : sw@nmu.ac.in, nss@nmu.ac.in

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

# विद्यार्थी स्वयंवृत्त
## विद्यापीठस्तरीय युवा संसद कार्यशाळा

१) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- -------------------------------------------------------------
२) वर्ग :-------------
३) जन्म तारीख :- / /
४) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही
५) रक्त गट :- ------
६) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ---------------------------------------------------------------
७) ई-मेल :-
८) भ्रमणध्वनी क्र. :-
०९) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- ---------------------------------------------------
१०) दूरध्वनी क्र. :- ( )
११) ओळखपत्र क्र. :------------------
१२) विद्यार्थी कल्याण उपक्रम सहभाग :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
१३) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

( )

**विद्यार्थ्याची सही व नाव**

---

### -: पालकाचे संमती पत्र :-

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ----------------------------------------- माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे --------------------------------------- हा/ही सदर कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहाणी दावा करणार नाही.

**पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी**

---

### -: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-

विद्यार्थी नाव ------------------------------- हा/हि नियमित शिक्षण घेत असुन नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. विद्यापीठस्तरीय युवा संसद कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का